# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः10.11.2024** **वारःरविवार**

---

1. राज्यात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला वेग, प्रचारसभांबरोबरच पदफेऱ्या, भेटीगाठी, मेळाव्यांचं आयोजन
2. सत्ताधारी आणि विरोधकांची आश्वासनांच्या खैरातीसह एकमेकांवर कडाडून टीका
3. मतदानाची टक्केवारी वाढवण्याच्या उद्देशानं अनेक ठिकाणी मतदान जनजागृतीपर कार्यक्रमांचं आयोजन आणि
4. भारताच्या पंकज अडवाणीनं आयबीएसएफ जागतिक बिलियर्डस् अजिंक्यपद स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं.

**<u>निवडणूक प्रचार सत्ताधारी</u>**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीच्या मतदानाला आता केवळ दहाच दिवस उरले असल्यानं राजकीय पक्षांच्या प्रचारानं आता वेग घेतला आहे. प्रचारसभा, मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी, विविध संस्थांसोबतच्या बैठका याद्वारे उमेदवार मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी यांनी काल नांदेड आणि अकोला इथं प्रचारसभा घेतली. मराठवाड्याच्या विकासासाठी महायुती सरकारनं अथक प्रयत्न केले आहेत असं, मोदी नांदेड इथल्या प्रचारसभेत म्हणाले. गेल्या अडीच वर्षात सरकारनं मराठवाड्यात 80 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केल्याचं सांगून, मराठवाड्यातल्या 11 सिंचन प्रकल्पांसह अन्य विकासकामांची माहिती त्यांनी दिली. काँग्रेसचं संविधान प्रेम बेगडी असल्याची टीका त्यांनी यावेळी केली. अकोल्यातल्या सभेत त्यांनी एक है तो सेफ है असा नारा देत विरोधकांवर जोरदार टीका केली. जम्मू काश्मीरमध्ये कलम 370 लागू करुन देशात दोन संविधानांची अंमलबजावणी केली जात होती. आम्ही कलम 370 कलम हटवून संबंध भारतात एकाच संविधानाची अंमलबजावणी केली असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परभणी इथं प्रचारसभा घेतली. युतीचं सरकार 10 कलमी योजना राबवणार आहे. आमचं सरकार देणारं आहे, घेणारं नाही असं शिंदे यावेळी म्हणाले. महायुतीचं सरकार पुन्हा सत्तेत आल्यावर शेतकऱ्यांना पूर्ण कर्जमाफी देऊ असं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चंद्रपूर इथल्या प्रचारसभेत दिलं. तसंच लाडकी बहीण योजनेतून महिलांना एकवीशे रुपये देऊ असं त्यांनी सांगितलं. वाशिम जिल्ह्यात कारंजा इथं झालेल्या प्रचारसभेत फडणवीसांनी महायुती सरकारनं राबवलेल्या विविध योजनांची माहिती दिली. यापुढे शेतकऱ्यांच्या मालाला हमीभावापेक्षा कमी दर मिळाला तर फरकाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करणार तसंच शेतकऱ्यांना 24 तास मोफत वीज, कर्जमाफी इत्यादी आश्वासनं त्यांनी दिली. उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार यांनी सांगली जिल्ह्यात आष्टा इथं प्रचारसभा घेतली. शेतकरी हा देशाचा कणा आहे, सरकार शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबवत असून त्याचा फायदा शेतकऱ्यांना होताना दिसतोय असं ते म्हणाले. राज्याच्या विकासासाठी 75 हजार कोटींच्या योजना सुरू केल्याचं त्यांनी सांगितलं.

पुण्यात कसबा मतदारसंघात महायुतीचा विजयसंकल्प मेळावा आयोजित करण्यात आला होता. तर कोथरुड मतदारसंघात भाजपा नेते चंद्रकांत पाटील यांनी मतदारांची प्रत्यक्ष भेट घेण्यावर भर दिला. पर्वती विधानसभा

मतदारसंघात महायुतीच्या उमेदवार आमदार माधुरी मिसाळ यांनी पदयात्रा आयोजित केली होती. छत्रपती शिवाजीनगर मतदार संघातले महायुतीचे उमेदवार सिद्धार्थ शिरोळे यांनी औंधरोड भागातील सर्व मंडळातील युवकांसोबत बैठक घेऊन त्यांना केलेल्या कामांची माहिती दिली.

**निवडणूक प्रचार विरोधक**

काँग्रेसनं कायमच लोकशाही आणि संविधान यांचं रक्षण आणि संवर्धन केलं आहे, असं काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी अमरावती इथल्या प्रचारसभेत सांगितलं. महाविकास आघाडीचं सरकार आल्यावर शेतकरी, महिला, युवा यांच्यासाठी कल्याणकारी योजना आणू, असं आश्वासन खर्गे यांनी दिलं.

महाविकास आघाडी सरकारच्या कालावधीत साडे सहा लाख कोटींचे सामंजस्य करार करून राज्यात उद्योग आणले, मात्र महायुती सरकारनं सर्व उद्योग गुजरातला नेले, अशी टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी नांदेड जिल्ह्यात लोहा-कंधार मतदारसंघातल्या प्रचारसभेत केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी हिंगोली, परळी आणि आष्टी इथं प्रचारसभा घेतली.

दरम्यान, काँग्रेस पक्षाची सत्ता असलेल्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी काल मुंबईत पत्रकार परिषद घेतली. तेलंगणचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार आणि हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सुख्खू यामध्ये सहभागी झाले होते. काँग्रेसनं या राज्यांमध्ये जाहीरनाम्यात दिलेली आश्वासनं पाळली नाहीत अशा खोट्या जाहिराती देऊन भाजपा जनतेची दिशाभूल करत आहे असा आरोप त्यांनी केला.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी जालना इथं प्रचारसभा घेतली. महायुती सरकारनं राज्याला लुटण्याचं काम केल्याची टीका त्यांनी केली. शेतीवर आधारीत उद्योग उभे करून त्या माध्यमातून युवक, महिलांसाठी रोजगार निर्मितीचा प्रयत्न करण्याचं आश्वासन पटोले यांनी दिलं. राज्यातल्या महिला, युवक आणि शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी महाविकास आघाडीला निवडून द्या असं आवाहन काँग्रेसचे आमदार विश्वजीत कदम यांनी सांगली इथल्या प्रचारसभेत केलं. पुण्यात काँग्रेसचे कँटोनमेंट मतदारसंघातले उमेदवार रमेश बागवे यांच्या मुख्य निवडणूक कचेरीचं उद्घाटन विधानसभेतील काँग्रेसचे गटनेते बाळासाहेब थोरात आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते झालं.

**मनसे प्रचार-यवतमाळ**

आपल्याकडील तरुण-तरुणींमध्ये बुद्धी आणि गुणांची कमतरता नाही, मात्र, राज्यकर्ते आणि राजकारण्यांमध्ये ती ओळखण्याच्या क्षमतेचा अभाव असल्याची टीका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी यवतमाळ जिल्ह्यातल्या उमरखेड इथल्या प्रचारसभेत केली.

**मतदान जनजागृती**

कोल्हापूर जिल्ह्यात 80 टक्क्यांहून अधिक मतदानाचं लक्ष्य गाठण्यासाठी जिल्ह्यातले सर्व मतदार मिळून 'आम्ही कोल्हापुरी जगात लय भारी पार करणार 80 टक्केवारी' असा संकल्प करुया, असं आवाहन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी काल केलं. कोल्हापूर इथं मतदान जनजागृतीसाठी आयोजित लोकशाही दौडचा प्रारंभ जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाला त्यावेळी ते बोलत होते. या लोकशाही दौडमध्ये पाच हजारांपेक्षा जास्त धावपटू सहभागी झाले होते. विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनीही यात मोठ्या संख्येनं भाग घेतला. यावेळी उपस्थित सर्वांना मतदान प्रतिज्ञा देण्यात आली.

पुणे जिल्ह्यात आकुर्डी इथल्या जैन स्थानकात मतदान जनजागृती करण्यात आली. यावेळी साध्वी डॉक्टर राजश्रीजी, डॉक्टर मेधाश्रीजी यांच्या उपस्थितीत शंभर टक्के मतदान करण्याची शपथ जैन बांधवांनी घेतली. शिरुर विधानसभा मतदारसंघात तळेगाव ढमढेरे आणि वाघोली ग्रामपंचायत क्षेत्रातील अंगणवाडी सेविका तसंच ग्रामस्थांनी मतदानाची शपथ घेतली. यावेळी शासकीय, निमशासकीय यंत्रणांचे प्रमुख अधिकारी आणि महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी नागरिकांना मतदानाचं आवाहन केलं. पुण्यात मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी 74 उपाहारगृहांनी मतदान केलेल्या मतदारांसाठी 20 आणि 21 नोव्हेंबर रोजी देयकावर 10 टक्के सवलत जाहीर केली आहे. अधिकाधिक पात्र मतदारांनी मतदान करुन या सवलतीचा लाभ घ्यावा, असं आवाहन जिल्हा स्वीप नोडल अधिकारी अर्चना तांबे यांनी केलं आहे.

राज्यातल्या नागरिकांना मतदानाचं आवाहन करताना अभिनेते विजय गोखले म्हणाले......

**<u>गृह मतदान-बीड</u>**

बीड विधानसभा मतदारसंघात कालपासून गृहमतदानाला सुरुवात झाली. याअंतर्गत 85 वर्षांवरील वृद्ध व्यक्ती तसंच पात्र दिव्यांग मतदारांच्या घरी जाऊन टपाल मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्यात येत आहे. आज संध्याकाळपर्यंत घेतल्या जाणाऱ्या गृहमतदानासाठी 22 पथकं नेमण्यात आली आहेत.

**<u>अवयवदान</u>**

अवयवदानाचा प्रचार करुन त्याचे प्रमाण वाढवण्यासाठी प्रशासन, सामाजिक संस्था, रुग्णालयं अनेक उपक्रम राबवत आहेत. गेली 24 वर्ष मरणोत्तर अवयवदानाचा प्रचार करणाऱ्या आरती देवगांवकर यांचा नुकताच आडकर फाउंडेशनतर्फे सत्कार करण्यात आला. आपल्या कामाविषयी बोलताना आरती देवगांवकर म्हणाल्या....

**<u>बिलियर्डस्</u>**

भारताचा बिलियर्डस् पटू पंकज अडवाणीनं आय बी एस एफ जागतिक बिलियर्डस् अजिंक्यपद स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं आहे. कतारची राजधानी दोहा इथं काल झालेल्या अंतिम फेरीच्या सामन्यात पंकजनं इंग्लंडच्या रॉबर्ट हॉलवर 4-2 असा विजय मिळवला. आय बी एफ एसच्या जागतिक बिलियर्डस् स्पर्धेतलं पंकज अडवाणीचं हे 18 वं विजेतेपद आहे. या स्पर्धेत भारताच्या सौरव कोठारीनं कांस्यपदक मिळवलं.

**<u>हवामान</u>**

राज्यात काल सर्वात कमी किमान तापमान नाशिक इथं 14 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. आज सर्वत्र हवामान कोरडं राहील आणि किमान तापमान सरासरीच्या आसपास असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.